दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ४४ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.९ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान

# मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते-बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान होत आहे. मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, असे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. मविआच्या नेत्यांनी काल आमदाराकीची शपथ न घेतल्यामुळे सत्ताधारी पक्षाकडून त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. या मुद्द्यावरून बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत मविआवर निशाणा साधला आहे.चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, हे त्यांनी आपल्या कालच्या कृतीतून सिद्ध केले.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शरद पवार यांच्याबद्दल आदर आहे मात्र, त्यांनी खोटारडे पणा करु नये. पराभवातून स्वीकारुन पुढे गेले पाहिजे त्यातून काही तरी शिकायला हवे, लोकसभा निवडणुकीत त्यांनी फेक नरेटीव्ह पसरवला होता. विधानसभेला लोकांनी त्यांना नाकारले. लोकसभेला त्यांचे ३१ खासदार निवडून आले तेव्हा त्यांनी आक्षेप घेतला नाही. त्यांच्या सर्व खासदार- आमदार यांनी राजीनामा द्यायला हवे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, वफ्फबोर्डाने बदमाशी करत जमीनी बळकावल्या आहेत. पुन्हा एकदा या सर्व गोष्टीचे ऑडिट केले पाहिजे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, विधानसभेतील नवनिर्वाचित सदस्यांना संविधानाच्या साक्षीने आमदारकीची शपथ घेणे संविधानिकदृष्ट्या आवश्यक असूनही मविआ सदस्यांनी शपथ घ्यायला नकार दिला. हा संविधानाचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आहे. याचा निषेध करावा तेवढे कमीच आहे.उद्धवसेनेचे गटनेते आदित्य ठाकरे यांच्या



नेतृत्वात विरोधकांनी 'आय लव्ह मारकडवाडी' असे फलक झळकावले. ठाकरे म्हणाले 'आम्ही जे आमदार विजयी झालोत त्यांच्या मनातही ईव्हीएमबद्दल शंका आहे, म्हणून शपथ घेतली नाही. मारकडवाडीत मतपत्रिकेवर मतदानाची तयारी झाली होती. हे मतदान जनतेच्या मनातील शंकांना उत्तर देणार होते. पण दडपशाही करून प्रशासनाने मतदान होऊ दिले नाही.'विधानसभेचे अधिवेशन पहिल्याच दिवशी ईव्हीएमच्या मुद्द्यावरून गाजले. शनिवारी २८८ पैकी सत्ताधारी१७३ आमदारांना हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी शपथ दिली. ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक महाविकास आघाडीच्या आमदारांनी मात्र शपथविधीवर बहिष्कार टाकला. विधानसभेत राष्ट्रगीत झाल्यानंतर हे आमदार बाहेर पडले. 'ईव्हीएम, निवडणूक आयोगामुळेच महायुतीला बहुमत मिळाले आहे,' असा ठपका ठेवत मतपत्रिकेवर पुन्हा निवडणूका घ्या,' अशी मागणी करत मविआच्या आमदारांनी विधिमंडळ परिसरात निदर्शने केली. विधिमंडळाच्या पायऱ्यांवरही आंदोलन केले. सोलापूर जिल्ह्यात मारकडवाडी या गावात मतपत्रिकेवर चाचणी मतदान घेण्याची प्रक्रिया प्रशासनाने दडपशाही मार्गाने उधळून लावली, असा आरोप करत विरोधकांनी प्रशासन व सरकारचा निषेध केला. दुसरीकडे, शपथविधीवर बहिष्कार टाकणे हा लोकशाहीचा अपमान आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

### पवारसाहेब नौटंकी नको- बावनकुळे

**विधानसभा निवडणुकीतील अपयश लपवण्याचे काम शरद पवार, राहुल गांधी करीत आहेत. पवारांबाबत मला आदर आहे पण ईव्हीएमबाबत पवारांनी नौटंकी करु नये, असा हल्लाबोल भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी केला आहे.आघाडीचे जे उमेदवार ईव्हीएममुळे विजयी झाले आहेत, त्या सर्वांना राजीनामा द्यावेत, असे आव्हान बावनकुळे यांनी केले आहे. ते विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलत होते.**

## मोबाईल फोनचा स्फोट

# मुख्याध्यापकाच्या मृत्यूची दुर्दैवी घटना

**गोंदिया । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी तालुक्यातील सिरेगावबांध येथे मोबाईल फोनचा स्फोट होऊन मुख्याध्यापकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बाईकवर प्रवास करत असताना घडली.मृत व्यक्ती सुरेश भिकाजी संग्रामे (वय ४५) हे गडचिरोली जिल्ह्यातील कसारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक होते. प्रवासादरम्यान, त्यांच्या खिशात ठेवलेल्या मोबाईल फोनचा अचानक स्फोट झाला. स्फोटामुळे कपडे पेटले आणि ते गंभीरपणे भाजले गेले. त्वरित रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.



त्यांच्या सोबत असलेले नत्थु गायकवाड सुद्धा या स्फोटामुळे पडले आणि गंभीर जखमी झाले आहेत.सुरेश संग्रामे हे एक आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने गावातील आणि शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

# वर्धा व भिवंडीतील शासकीय हॉस्पिटलला बनावट औषधांचा पुरवठा, चौघांवर गुन्हा दाखल

**वर्धा । प्रतिनिधी**

शासकीय हॉस्पिटल्सना बनावट औषधांचा पुरवठा करणाऱ्या चार जणांवर अंबाजोगाई शहरात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासात उघड झाले की, केवळ अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातच नाही, तर वर्धा आणि भिवंडीमध्येही बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. या प्रकरणी सुरत आणि ठाणे येथील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

महाराष्ट्र शासनाने औषध पुरवठा कंत्राटदार



म्हणून नेमलेल्या व्यक्तीने बनावट औषधांचा पुरवठा केला, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासाने उघड केली आहे. या प्रकरणी औषधी निरीक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश पाटील, मिहीर त्रिवेदी, द्विती त्रिवेरी आणि विजय चौधरी यांच्यावर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.




**श्री साई हॅण्डलूम एम्पोरियम शिर्डी चे संचालक योगेश शिंदे यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदार चे वरिष्ठ संपादक डॉ. यशवंत घुमे व संपादक आशिष घुमे यांचा सत्कार केला त्यावेळी टिपलेले छायाचित्र**




दैनिक सह्याद्रीचा राखणदार ची राज्यस्तरीय बैठक शिर्डी येथील शासकिय विश्राम गृह येथे संपन्न झाली त्यावेळी टिपलेले छायाचित्र

# पराभवानंतर ईव्हीएमवर आरोप- एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

तुम्हाला विजय मिळतो. तुम्हाला जागा जास्त मिळतात तेव्हा ईव्हीएम चांगला असतो. पराभव होतो. तेव्हा ईव्हीएम खराब असतो. सुप्रीम कोर्टापासून निवडणूक आयोगापर्यंत त्यांच्या बाजूने निकाल लागला तर यंत्रणा चांगली. विरोधात निकाल गेला तर कोर्टावरही आरोप केले, असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केला आहे.एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी झारखंड, कर्नाटकात मतदान झाले. लोकसभेत झाले. प्रियांका गांधीही पोटनिवडणुकीत विजयी झाल्या. जेव्हा आपला पराभव होतो तेव्हा ईव्हीएम घोटाळा म्हणायचे. जेव्हा जिंकतो तेव्हा बॅलेट पेपरची कोणी मागत नाही. हा दुटप्पीपणा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.एकनाथ शिंदे म्हणाले की, घरी बसणाऱ्यांना लोकं मतदान करत नाही. काम करणाऱ्यांना, फिल्डवर असणाऱ्यांना मतदान करतात. लोकसभेत दोन लाखांचा फरक असून त्यांना जागा जास्त असून त्यांचे उमेदवार जास्त आले. विरोधीपक्षाकडे कोणताही मुद्दा राहिला नाही. मी म्हणालो होतो विरोधकांना लाडक्या बहिणी चार महिन्यात चीत करेल आणि तसेच झाले.एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाही मार्गाने झालेल्या निवडणुका जनतेने आमचं अडीच वर्षाचं काम पाहिलं. मी पुन्हा पुन्हा सांगायची गरज नाही. महाविकास आघाडीने बंद पाडलेले प्रकल्प आम्ही वेगाने पूर्ण केले. लाडक्या बहिणीपासून अनेक योजना केल्या. त्याची पोचपावती मिळाली.

# विज चोरी पकडली म्हणून परप्रांतीय व्यावसायिकांची महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनाच बेदम मारहाण

## गोंडपिपरी पोलिसात तक्रार दाखल;त्या परप्रांतीय १७ आरोपींना पोलिसांनी घेतले ताब्यात

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी शहरात दि.(६) शुक्रवारी काही अज्ञात इसमांकडून इलेक्ट्रिक पोलवर अनधिकृतपणे लोखंडी आकडा टाकून वीजचोरी करत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते दीपक वांढरे यांनी महावितरण विभागाला दिली. महावितरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी व कारवाईचे आदेश लाईनमेन हिराजी ठेंगणे,तंत्रज्ञ रवींद्र जांभुळकर,प्रेमानंद गौरकार यांना फोन करून सांगितले.या तिन्ही महावितरण कर्मचाऱ्यांनी सहकारी मित्र किशोर बोरकुटे याला सोबत घटनास्थळी धाड टाकली.

शहरात चिंतामणी कॉलेजच्या बाजूला राजस्थान,मध्यप्रदेश येथून आलेल्या खुर्च्या,टेबल विक्रेत्यांकडून अनाधिकृतपणे विज चोरी करत असल्याचे आढळून आले .यावेळी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी त्या राजस्थान, मध्यप्रदेशच्या खुर्च्या विक्रेत्यांना सांगितले की हे अनाधिकृतपणे आहे त्यामुळे याच्यामुळे एखादी घटना घडू शकते तुमच्यावर कारवाई होणारं असे सांगतात तुम्ही कोण आम्हाला सांगणारे म्हणून त्या खुर्च्या विक्रेत्यांच्या जमावाने या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना व सोबत आलेल्या सहकाऱ्याला बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर अशी दुखापत अधिकाऱ्यांना झाली त्यांच्यावरती गोडपिंपरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून स्थानिक नागरिकांकडून त्या खुर्च्या टेबल परप्रांतीय विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केल्या जात आहे . लाईनमेन ठेंगणे महावितरण तर्फे पोलिसात तक्रार दाखल केली असून १७ आरोपींना रात्रीच शोध मोहीम राबवून ताब्यात घेत त्यांच्यावरती गुन्हे दाखल केले आहे .पुढील तपास पीएसआय मंगेश कराडे,प्रशांत नैताम करीत आहे.



**"परप्रांतीय नागरिकांकडून गोंडपिपरीतील वीज वितरण कर्मचाऱ्यांना झालेली मारहाण ही निंदनीय आहे पोलिसांनी कठोर कारवाई करावी.शहरात वास्तव्यास असणाऱ्या बाहेरील अनोळखी व्यक्तींचे आधार कार्ड व संपूर्ण माहिती पोलीस स्टेशनमध्ये जमा करूनच त्यांना राहण्याची परवानगी द्यावी.**

### सचिन चिंतावार नगरसेवक गोंडपिपरी

**तालुक्यात मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना घडत आहे. अशावेळी बाहेरून येणारे परप्रांतीयांमुळे असुरक्षितता वाढली आहे . राज्यात मोठ्या प्रमाणात महिलांवरती अत्याचार होत आहे अशावेळी परप्रांतीयांकडून मुजोरी करून स्थानिक लाईनमेन यांना मारहाण करण्यापर्यंत जर यांची मजल जात असेल तर येणाऱ्या दिवसात एखादीं मोठी घटना घडू शकते त्यामुळे वेळीच यांच्यावरती आवर घालून बाहेरून येणाऱ्या परप्रांतीय लोकांची संपूर्ण माहिती पोलिसात जमा केल्यानंतरच त्यांना तालुक्यांत राहण्यासाठी परवानगी द्यावी व प्रशासनाने जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.**

**–सुरज माडूरवार शिवसेना तालुकाप्रमुख गोंडपिंपरी**

# साठगांव येथील महानुभाव श्रीदत्तमंदिर यात्रा महोत्सव

## १५,१६ डिसेंबरला भव्य आयोजन

**डॉ. यशवंत घुमे**

चंद्रपूर, नागपूर व भंडारा या तिन्ही जिल्ह्यांच्या सीमाहद्दीवर वसलेलं तथा चिमूर–कान्पा–नागपूर मार्गावरील शंकरपूर, कान्पा, भुयार, निलजफाटा व भिवापूर या गावापासून ७ ते ८ कि. मी. अंतरावर आडमार्गावर असलेल छोटस गांव साठगाव. एकेकाळी केवळ ६० घराची वस्ती असलेल आणि आता अंदाजे १८०० ते २००० लोकसंख्या असणारं हे गाव भोसलेकालीन काळात काही नैसर्गिक आपत्ती व पेंढारी (लुटारू) यांच्या लुटीत पूर्णपणे उध्वस्त झाले होते. या गावाचे आकर्षण म्हणजे आज गावालगतच्या टेकडीवर उभे असलेल श्रीदत्तात्रेय प्रभूचे भव्य पुरातन मंदिर.

याबाबत थोडक्यात असे की, इ.स. १७८५ मध्ये चांदापूर (जी.चांदा) राजे भोसले यांचेशी इंग्रजाच्या लढाईचा उल्लेख महानुभाव ग्रंथामध्ये आला आहे. त्यावेळी माहूर संस्थानमधून भोसलेकालीन राज्याचा कारभार पहिला जात असे. त्याकाळात राजे भोसले यांचेकडून विजयी सेनाप्रमुख गावंडे कुटुंबातील पराक्रमी व्यक्तीला परागणे 'साठगाव' चिमूर हा भाग मालगुजारीत मिळाला. गावंडे कुटुंब मूळ यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस गावचे. यांचा माहूर संस्थानशी पूर्वीपासून सबंध होता. गावंडे कुटुंब साठगावला मालगुजार म्हणून स्थाईक झाले व त्यांनी श्रीदत्तात्रेय प्रभू यांचे निद्रास्थान देवदेवेश्वरी संस्थान, माहूर येथे खाचर बैलाने देवदर्शानाकरिता माहुरवारी सुरु केली. पूर्वीच्याकाळी तीर्थयात्रेवरून परत आल्यानंतर गावाचे शिवेवर किंवा मंदिरात एक रात्र मुक्काम केल्या जात असे. अशाच एका वारीमध्ये मालगुजार गावंडेपाटील यांनी सुध्दा त्याकाळी गावापासून दूर असलेल्या टेकडीवर मुक्काम केला असता त्यांना स्वप्न पडले. मी तुझे सोबत आहे. याचस्थळी माझी पुजेची व्यवस्था कर. या गावाचे भाग्य उदयास येईल. तेथे पाहणी केली असता 'सर्वतीर्थ' माहूर येथील विशेष असल्याचे दिसले. तेव्हापासून झोपडीवजा मंदिरात विशेषाची स्थापना करून त्रिकाळ पूजाअर्चा सुरु केली असून आजही नित्यक्रमाने सुरु आहे.

गावंडे कुटुंबाचे स्वप्न साकार झाल्यानंतर इ.स. १८६४ मध्ये श्रीमती राधाबाई धर्माजीपाटील गावंडे यांनी साठगांव येथे श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराचे बांधकाम सुरु केले. तेव्हापासून येथे तीन दिवसीय श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव सुरु झालेला असून अलिकडे श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव दोन दिवसांचा करण्यात आलेला आहे. राधाबाईने माहूरवारी बंद करून गोंदिया






जिल्ह्यातील डाकराम–सुकळी (चक्रधर स्वामीचे चरणांकित स्थान) येथील वारी सुरु केली ती आजही सुरु आहे. राधाबाई नंतर त्यांचा मुलगा कवडूजीपाटील यांनी तर त्यानंतर रामचंद्रजी, हरिचंद्रजी, देविदासजी व उमेशजीपाटील यांनीही श्रीदत्तजयंती यात्रेचा वारसा जोपासला असून आजही पुढील पिढीकडून हे कार्य सुरु आहे. न्यास नोंदणीनंतर अध्यक्ष म्हणून कै.कवडूजी धर्माजीपाटील गावंडे, कै.रामचंद्र कवडूजीपाटील गावंडे व श्रीमती लीलाबाई रामचंद्रपाटील गावंडे यांनी कार्यभार सांभाळलेला आहे.

सन १९८० मध्ये कवडूजीपाटील यांनी कै.म.जयकृष्णबाबा दर्यापूरकर (वणी) यांचेकडून संन्यास दिक्षा घेतली व त्यानंतर ते साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास राहू लागले. त्यांच्या पत्नी कासुबाई व मुलगी शेवंताबाई ह्या सुध्दा वृद्धापकाळात मंदिरात वास्तव्यास होत्या. तसेच देवदेवेश्वरी संस्थान, माहूरचे विद्यमान पिठाधीश महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकरशास्त्री कवीश्वर हे १५ वर्षे, महंत सुधाकरबाबा संन्याशी (उमरखेड) हे २ वर्षे व कै.त. भागुबाई पातुरकर (मनसळ) ह्या १२ वर्षे साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास होत्या. या पुरातन महानुभाव श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराची उभारणी चुनखडी मिश्रित विटांनी करण्यात आली असून समोरील सभामंडप नंतर बांधून दिलेला आहे. श्रीदत्तात्रेय प्रभूच्या विशेषावर अत्यंतवेधक व कलाकुसरयुक्त चांदीचा मुखवटा बसविला आहे. लाकडी रथावरील नक्षीकाम उत्कृष्ट कलेचा नमुना असून हा लाकडी रथ साठगांव येथील कै.राखुंडे परिवार यांनी तयार केला आहे. साठगांव येथील श्रीदत्तप्रभूची महिमा पंचक्रोशीत असून चैत्र पौर्णिमा, आषाढी पौर्णिमा, नारळी पौर्णिमेस भाविक मंडळी बहुसंख्येने पूजाअर्चा करण्याकरिता येत असतात. काही भक्तगण ५ दिवसांपासून तर सव्वा महिन्यापर्यंत धरणे (वास्तव्यास) असतात. नवरात्रामध्ये सदभक्ताकडून येथे ९ दिवस पंगती असतात. मार्गशीर्ष महिन्यात भक्तजन सह्भोजनाकरिता येत असतात.

मार्गशीर्ष पौर्णिमेपासून येथे श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव असते. प्रथम दिवशी सकाळी श्रीदत्तप्रभूचा जन्मोत्सव, ध्वजारोहण साजरा करण्यात येतो. सायंकाळी बँड व भजनाच्या गजरात दत्ताप्रभूचे नामघोषात विशेषाची रथशोभा यात्रा काढण्यात येते. गावामध्ये या रथशोभायात्रेचे ठिकठीकाणी स्वागत करून विशेषास विडाअवसर व उपहार समर्पण करीत असतात. गावातील काही सद्भक्तमंडळी रथशोभा यात्रेनिमित्य नास्ता, अल्पोपहार, चहापान व फळांचे वाटप करीत असतात. दुस–या दिवशी (मार्गशीर्ष प्रतिपदा) भजन, प्रवचन, कीर्तन, दहीहंडी, गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. गावातील युवक मंडळी यात्रेनिमित्य आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, मैदानी खेळ व नाटकाचे आयोजन करीत असतात.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनाचा कार्यक्रम सन १९७१ ला साठगाव येथे जि.प. प्राथमिक शाळेच्या उदघाटनप्रसंगी झाला असून त्यावेळी त्यांनी आयुर्वेदाचार्य डाँ.भैरवारदादांसह श्रीदत्तमंदिरास भेट देवून दर्शन घेतले. मध्यंतरीच्या काळात महानुभाव पंथीयांची पालखी यात्रा श्रीक्षेत्र रिद्धपूर येथील यक्षदेव मठातील कै.आचार्य म.मुरारीमल्लबाबा व कै.म.प्रभाकरशास्त्री यक्षदेव त्याचप्रमाणे कै.म.गोपीराजबाबा (जुने) तर सन २००२ मध्ये म.विद्याधरदादा पंजाबी (वाघोदा) हे मार्ग मंडळीसह साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात धर्म प्रचारासाठी आलेले होते. सन २०२२ मध्ये जाधववाडी येथील आचार्य मोठेबाबा मार्ग मंडळीसह पुयारदंड, त.भिसी येथे वास्तव्यास आले असताना साठगांव येथील श्रीदत्त मंदिरात दर्शनाकरिता आले होते. तसेच म.श्री. नागराजबाबा उर्फ गोपीराजबाबा शास्त्री (रीद्धपूर), म.श्री.न्यायबांसबाबा उर्फ सैंगराज शास्त्री (मकरधोकडा), साहित्याचार्य म.श्री.बा.भो.शास्त्री (करमाड), म.श्री.एकोबासबाबा उर्फ वसंतराज शास्त्री (खुटाळा चंद्रपूर), म.श्री.मुधोव्यासबाबा उर्फ संजयराज शास्त्री (एकार्जुना, वरोरा), म.श्री.परसराजबाबा उर्फ संतोषराज शास्त्री (वणी), म.श्री.कळमकरबाबा (गाढेजळगाव), म.श्री.दत्तराजबाबा शेवलीकर (सोलापूर), म.श्री.प्रभाकारदादा कपाटे (भोकर), म.श्री.सायराजदादा पुजदेकर (नाशिक), म.श्री.गोविंदराजदादा बिडकर (लातूर), म.श्री.निर्मलमुनी बाभूळगावकर (जालीचादेव), म.श्री.उध्दवराज दिवाकरबाबा (लोणारा, भद्रावती), म.श्री.देपेराजबाबा (नागपुर), म.श्री.कृष्णामुनी (रिद्धपूर), म.श्री.वकीराजदादा अस्टूनकर (डाकराम सुकळी), म.श्री.कान्हेराजदादा (काटोल), म.श्री.संजयदादा भोजने (जालीचादेव), म.श्री.योगीराजदादा (हदगाव), त.पुष्पाताई विराट (मकरधोकडा), त.डाँ.मालतिताई बिडकर, त.विमलताई शेवलीकर (विठ्ठलवाडी नागपूर), त.विमलताई शीवनेकर (दहेगाव), किर्तनकार श्री.दामोधरशाहीर वाजीरगावकर (नांदेड), श्री.दादाराव उके (नेर), म.बिडकरबाबा (सातारा), म.माधव्यासबाबा (सालबर्डी), श्री मनोहर फाये, श्री दुलीचंद तुरकर, श्री अमर ठमके, श्री योगेश कपाटे, श्री सुरेशभाऊ वाईन्देशकर, ह.भ.प.श्री पंजाबराव अंभोरे, ह.भ.प.चांगदेवदादा (सालोरी), ह.भ.प. नामदेवदादा (टाका), कै.म.राजेन्द्रप्रसाद शेवलीकर उर्फ म.सुगावकर (बदनापूर), कै.म. अशोकशास्त्री माहुरकर (माहुर), कै.म. दयालमुनी अन्कुलनेरकर (वडवाडी, पैठण), कै.म.चक्रपानीबाबा (मौदा), कै.म.शिवनेकरबाबा (दहेगाव), कै.म.विलासशास्त्री (वणी), कै.म.नागापुरकरबाबा (चिंचभुवन), राष्ट्रीय किर्तनकार कै.म.कपाटेबुवा, कै.म.यादोबुवा (टाका), कै.म.श्यामसुंदरशास्त्री (नागपूर) कै.म.श्रावणबुवा (साठगाव), कै.माणिकलाल बारसागडे, समाजसेविका शकुंतलाबाई कपाटे, आदींनी श्रीदत्त जयंती यात्रा महोत्सवानिमित्य उपस्थित राहून प्रवचन, किर्तन, भजन यामधून महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, अहिंसा, आत्महत्या, बुवाबाजी, कर्मकांड, स्वच्छता अभियान, समाजप्रबोधन याबाबत जनजागृती केलेली आहे.

त्याचप्रमाणे देशभक्त वामनराव गावंडे, कै.माजी खासदार नामदेवराव दिवटे, कै.माजी विधानसभा उपाध्यक्ष मो.वी.टेमुर्डे, कै.माजी आमदार मेश्राम साहेब, कै.माजी आमदार वसंतराव इटकेलवार, माजी राज्यमंत्री डाँ.रमेश गजभे, माजी आमदार डाँ.अविनाश वारजूकर, माजी आमदार सुधीर पारवे, जागतिक कृषी तज्ज्ञ डाँ.रमेश ठाकरे, माजी कुलगुरू वाय.एम.टाले, न्युरो सर्जन डाँ. मिलिंद देवगावकर, डाँ.शैलेजा देवगावकर, कै.डाँ.रा.बो.मेश्राम, कै.डॉ.तु.वी.गेडाम, माजी जि.प.अध्यक्ष संतोष रावत, माजी जि.प.अध्यक्ष डाँ.सतीश वारजूकर, माजी जि.प.अध्यक्ष संतोष कुमरे, श्री सुधाकरराव मेंघर, साजन शेंडे, प्रा.बी.जी.रडे, सर्वज्ञ विचारमंच तळोधी आदी मान्यवर मंडळी यांनी यात्रेनिमित्य सदिच्छा भेटी दिलेल्या आहेत.

या मंदिरास तिर्थक्षेत्राचा क वर्ग दर्जा प्राप्त असून तिर्थक्षेत्र विकास निधी योजनेअंतर्गत सभामंडप, धर्मशाळा, स्वच्छतागृह, पाण्याची छोटी टाकी, पेव्हिंग ब्लाक फिटिंग, संरक्षण भिंत इ. कामे करण्यात आलेले आहेत. तसेच अर्धवट, संरक्षण भिंतीचे काम, मंदिरामागील गावाला जोडणारा अंदाजे २५० मीटरचा रस्ता पथदिव्यांसह करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर पुरातन मंदिराचे आतील भागाचे नुतनीकरण विद्यमान महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकर शास्त्री कवीश्वर यांचे आशीर्वादाने, विनोद रा. गावंडे यांचे पुढाकाराने, सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे सहकार्याने पूर्ण केले असून मंदिराचे बाहेरील भागाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सर्व गावकरी तथा परिसरातील सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे अपार श्रध्दा व स्नेहाने गावंडे परिवार श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिर साठगाव येथील श्रीदत्तात्रेय प्रभू जयंती यात्रा महोत्सव आजही मोठ्या उत्साहाने साजरा करतात. आणि सदभक्त मंडळी मोठ्या संख्येने येथे येवून श्रीदत्तप्रभू चरणी लीन होतात.

# विवेकानंद महाविद्यालयात चंद्रपुर जिल्हा अजिंक्यपद खो–खो स्पर्धा संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात चंद्रपुर जिल्हा अजिंक्यपद वरिष्ठ गट पुरुष व महिला स्पर्धा व निवड चाचणी सामने द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, भद्रावती तसेच विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आल्या.

या स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यातील एकुण ७ खो–खो क्रीडा मंडळानी सहभाग घेतला होता. द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ भद्रावती, नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ, चंद्रपुर , तालुका क्रीडा संकुल, वरोरा, संभाजी क्रीडा मंडळ, वरोरा, आनंदवन स्पोर्ट्स हब, वरोरा, युवा क्रीडा मंडळ, चंद्रपुर, ज्ञान ज्योती क्रीडा मंडळ, नवरगाव

निवड चाचणीच्या अंतिम सामन्यात द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ भद्रावती पुरुष संघाने नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ चंद्रपुर या पुरुष संघावर २०–१८ असा २ गुणांनी विजयी झाला. तर महिलांच्या अंतिम



सामन्यात नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ चंद्रपुर या संघाने तालुका क्रीडा संकुल वरोरा या संघावर ११–८ असा ३ गुणांनी विजयी झाला. संपन्न झालेल्या निवड चाचणी स्पर्धेतुन चंद्रपुर जिल्हा पुरुष व महिला या दोन्ही संघाची राज्यस्तरीय खो खो स्पर्धेकरिता निवड करण्यात आली. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे चंद्रपुर जिल्हा खो–खो असोसिएशन चे सचिव अशोक मोरे , प्रा. संगिता बांबोडे, प्रा. डॉ. यशवंत घुमे, दिनेश कोयचाडे , अनिल नरुले , दिपक ठाकरे, दलित बदखल , योगेश मेनेवार, संतोष निंबाळकर , युवराज भारती विनोद कावटे , भुषण बावणे, दिपक कावटे , योगिता शिंदे, सुचिता ढेंगळे, माधुरी अवघडे इ. मान्यवर उपस्थित होते.

# डॉ.सुजय विखे यांनी पारनेर येथे कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथे मी कधीच काही बोलत नाही. मात्र न बोलतासुद्धा सर्व काही करत असतो. माझे काम येथील कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याचे व त्यांच्या भावना उच्चस्तरीय पातळीवर पोहचविण्याचे आहे. मी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करतो.हे काम करता आले, तरच ती व्यक्ती नेता होऊ शकते, असे प्रतिपादन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या पत्रकारांशी बोलताना केले.

डॉ. विखे पाटील शनिवारी दुपारी पारनेरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले की, आमचे कार्यकर्ते लोकसभेला व विधानसभा निवडणुकीत पक्षासाठी भरपूर पळाले. त्यांच्या भावनांचा आदर केला पाहिजे, त्यांचे मत काय आहे ,ते वरिष्ठ पातळीवर पोचविण्याची माझी जबाबदारी आहे, यातच सर्व काही आले.



डॉ. विखे यांचे सुपे येथे भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, पारनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्तानाना पवार, मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, जिल्हा युवा सरचिटणीस सागर मैड, मनोज मुंगशे, सुनील पवार, मधुकर पठारे, अमोल मैड, राहुल पवार, संग्राम पवार, गंगाराम पवार आदींसह कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. त्यांनी तालुक्यात म्हसणे फाटा, नारायणगव्हाण, पारनेर अशा विविध ठिकाणी कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. त्यांचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. वडनेर हवेलीचे सरपंच लहू भालेकर यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झालेअसल्याने त्यांच्या घरी जाऊन डॉ. विखे यांनी त्यांचे सांत्वन केले.

# क.जे.सोमैया मध्ये भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

हिंद सेवा मंडळाच्या क .जे . सोमैया हायस्कूल मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला . या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे दैनिक सार्वमत उपसंपादक अशोक गाडेकर, शभुक विद्यार्थी वसतीगृह अधिक्षक अशोक दिवे, प्रसिद्ध उद्योजक सामाजिक कार्यकर्ते कैलास खंदारे, शालेय समिती सदस्य चंदकांत कर्नावट, किशोर फुणगे, विघालयाच्या माजी जेष्ठ शिक्षिका श्रीमती शशी लोळगे, सेवक प्रतिनिधी कल्याण लकडे, मुख्याध्यापक भूषण गोपाळे उपस्थित होते . प्रमुख मान्यवरांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या




प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून व्यक्त केली . शंभुक वसतीगृहाचे अधिक्षक यांनी आपले मनोगतात कामगार, महिला, वंचित उपेक्षितच शैक्षणिक आदि सेवा क्षेत्रात डॉ. बाबासाहेबांच्या महान कार्याची माहिती विशद केली . कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक गाडेकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष सोले यांनी केले . सुत्रसंचालन रुपाली केवल यांनी केले . आभार अनिल चोभे यांनी मानले . कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

# ई व्ही एम हटाव;देश बचावच्या स्वाक्षरी अभियानास शेवगाव शहरात उस्फुर्तपणे प्रतिसाद

**शेवगाव । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीयअध्यक्ष ऍड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व मतदार संघात ईव्हीएम विरोधात मतदारांची स्वाक्षरी मोहीम दि ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे

या अनुषंगाने आज शेवगाव येथे शहर व तालुक्यातील अनेक स्वाभिमानी मतदारांनी ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीमेत उपस्थिति दर्शवली शेवगाव शहरातील क्रांती चौक येथे वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा किसन चव्हाण यांनी प्रथम स्वाक्षरी करून तालुक्यातील स्वाक्षरी अभियानास सुरुवात झाली शेवगाव तालुका अध्यक्ष शेख प्यारेलालभाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली आहे

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष



प्रा किसन चव्हाण व शेख प्यारेलालभाई यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या यावेळी अरुण पाटील झांबरे, ऑगस्टीन गजभीव, लक्ष्मण मोरे, शेख सलीम जिलाणी, गणेश बोरुडे, संभाजी कुसळकर,भिमा गायकवाड, सुरेश खंडागळे, नितीन गुंजाळ, पप्पू गर्जे, संजय चव्हाण, ज्ञानेश्वर पिटेकर, सुंदर आल्हाट व ईतर सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# २०२५ मध्ये वर्षभर महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, ग्रामपंचायत निवडणुकीचा धुराळा उडणार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :सहा महिन्यांपूर्वी देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्यात. यानंतर महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्यात. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले आहे.

दुसरीकडे विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला कौल दिला.

इतिहासात पहिल्यांदाच महायुतीला एवढे बहुमत मिळालयं.२०२४ हे वर्ष लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमुळे गाजले. दरम्यान २०२५ मध्ये देखील अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये महानगरपालिका, जिल्हा परिषद, १४ पंचायत समिती, १२ नगरपालिका आणि ९९ ग्रामपंचायतीसाठी निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.



यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा अहिल्यानगर जिल्ह्यात राजकीय रणधुमाळी दिसेल आणि या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आत्तापासूनच राजकीय पक्षांच्या माध्यमातून तयारी सुरू करण्यात आली आहे.लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी मोठी कसरत घेतलेली आहे. यामुळे आता आमदार, खासदारांना या निवडणुकांमध्ये तिकीट वाटप करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

साहजिकच, या निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या फारच अधिक राहणार आहे अन यामुळे तिकीट वाटपात रुसवे-फुगवे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळणार असून आपल्या कार्यकर्त्यांना सांभाळता सांभाळता आमदार, खासदारांच्या नाकी नऊ येणार आहे.

मागील दोन अडीच वर्षांपासून जिल्ह्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती यांच्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असून या निवडणुका लवकरात लवकर होणे गरजेचे आहे.


अहिल्यानगर महानगरपालिकेत ६८ नगरसेवकांचे संख्याबळ असून त्या ठिकाणी डिसेंबर २०२३ पासून प्रशासकांच्या हाती कारभार आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेबाबत बोलायचं झालं तर तिथे ७३ सदस्यांचे संख्याबळ असून त्या ठिकाणी मार्च २०२२ पासून प्रशासक कारभार पाहत आहेत. २०२४ डिसेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यातील ८४ ग्रामपंचायतीची मुदत संपणार असल्याचे समजते

महत्त्वाचे म्हणजे जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ दरम्यान आणखी १४ ग्रामपंचायतची मुदत संपणार असून या संबंधित ग्रामपंचायतीची प्रभाग रचना कार्यक्रम सुद्धा जाहीर करण्याचे काम सुरु आहे. यामुळे पुढील वर्षी या कार्यकाळ संपणार्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम राहणार आहे. तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे या निवडणुका लढवल्या जाणार नाहीत. लोकसभा आणि विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका महाविकास आघाडी आणि महायुती मध्ये झाल्या होत्या.मात्र या पंचायतराजच्या निवडणुकांमध्ये स्थानिक पातळीवर आघाडी बनवून निवडणूक लढवली जाऊ शकते किंवा पक्ष बलावर स्वतंत्र निवडणूक लढवली जाणार आहे.

# पोलीस व राजकीय नेत्यांना धमकी देणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर: शहराच्या कोतवाली पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यासह इतर कर्मचारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन करून शिवीगाळ केल्याची व प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेत्यांना बॉम्बस्फोट करून उडवून देण्याची धमकी दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी भाऊसाहेब नारायण शिंदे (रा. चिचोंडी पाटील, ता. अहिल्यानगर) याच्याविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




भाऊसाहेब शिंदेने कोतवाली पोलीस ठाण्यात फोन करून महिला कर्मचारी व एका पुरुष कर्मचाऱ्याला शिवीगाळ केली तसेच पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी व विविध वरीष्ठ पोलिस अधिकारी, राजकीय नेत्यांची नावे घेऊन त्याने शिवीगाळ केली. प्रशासकीय अधिकारी व राजकीय नेत्यांना बॉम्बस्फोट करून उडवून देईल, अशी धमकीही त्याने दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, शिंदे याला कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याला पोलिसी खाक्या दाखवला.

# मोफत प्लास्टीक सर्जरी शिबीराचे उद्घाटन संपन्न

**शिर्डी । प्रतिनिधी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व डॉ.राम चिलगर गीव्ह मी फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांचे संयुक्त विद्यमाने दि.०६ डिसेंबर २०२४ ते दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात (२०० रुम ) येथे प्लास्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेत आलेले आहे. सदरील शिबीराचा उद्घाटन समारंभ श्री साईबाबा संस्थानचे प्र.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, संदिप कुमार भोसले यांचे अध्यक्षतेखाली आज दि. ०६ डिसेंबर २०२४ रोजी पार पडला. सदर शिबीराचे वेळी बोलताना प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रुग्णालयातील डॉक्टर्स , नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचारी यांच्या सेवाभाव वृत्तीमुळे येथे होणारे सर्व शिबीरे यशस्वी होवुन त्याचा गरीब व गरजु रुग्णांना मोठा फायदा होत असुन यातुन श्री साईबाबांच्या रुग्ण सेवा हिच ईश्वरसेवा या शिकवणीचा प्रत्यय येथील वातावरणातुन नेहमी येत असलेबाबत सांगीतले.




यावेळी गीव्ह मी फाउंडेशन चे डॉ.राम चिलगर, डॉ.सुजित खोडे, डॉ.स्वाती पांडे प्र.वैद्यकीय संचालक, डॉ.प्रितम वडगावे, प्र.वैद्यकीय अधिक्षक डॉ.मैथिली पितांबरे, डॉ.राम नाईक, डॉ.विद्या बो-हाडे, डॉ.रेवन येंगे, डॉ.गोविंद कलाटे, डॉ.मृणाली गोंदकर, डॉ.प्राजक्ता बनकर, जनसंपर्क अधिकारी, सुरेश टोलमारे, प्र.अधिसेविका, नजमा सय्यद यांचे सह रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थीत होते. शिबीर यशस्वी व्हावे याकरीता सर्व ओटी/वार्ड इन्चार्ज, नर्सिंग स्टाफ यासंह कर्मचारी प्रयत्नशील आहेत. कार्यक्रमाचे प्रस्तावीक, डॉ.मैथिली पितांबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सुरेश टोलमारे यांनी मानल

# पाथर्डीतील मृतदेहाची घटना
## नातेवाईकांनी दाखल केले होते मिसिंग रिपोर्ट

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील खेर्डा फाटा येथील सुशील लुणावत यांच्या शेतात एक मृतदेह आढळला आहे. मृत व्यक्तीची ओळख मिठू भाई भिकण भाई शेख, निवासी नवीपेठ, पाथर्डी अशी करण्यात आली आहे.



मिठू भाई शेख हे २५नोव्हेंबर २०२४ रोजी बेपत्ता झाले होते, त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात मिसिंग रिपोर्ट दाखल केला होता. काही आठवड्यांनंतर, आज सकाळी ०७:०० वाजता खेर्डा फाटा येथील शेतात त्यांच्या मृतदेहाची कुजलेली स्थिती आढळली.

पाथर्डी पोलीस दलाने घटनास्थळी त्वरित पोहोचून तपास सुरू केला. मृतदेह सिव्हील हॉस्पिटल, पाथर्डी येथे शवविच्छेदनासाठी पाठवला गेला आहे. घटनास्थळी पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असून, मृत्यूचे कारण शोधण्यासाठी अधिक तपास केला जात आहे.

पोलिस उपनिरीक्षक आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेची सखोल तपासणी केली जात आहे. पाथर्डी पोलीस निरीक्षक मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली तपासाची कार्यवाही सुरू आहे.

मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांकडून अधिक माहिती घेण्यात येत असून, साक्षीदारांचीही चौकशी केली जात आहे. पोलिसांचा संशय आहे की, मृत्यू अपघाती आहे की अन्य कोणत्या कारणामुळे झाला हे अजून अस्पष्ट आहे.

पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १९४ प्रमाणे आ.मृ रजिस्ट्री दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणावर अधिक तपास सुरू ठेवला आहे आणि मृत्यूच्या कारणाचा उलगडा लवकरच होईल, अशी आशा व्यक्त केली आहे

# आमदार पंकज भोयर यांनी विधानसभेत दिला 'जय श्रीराम जय शिवराय'चा नारा

**वर्धा । प्रतिनिधी**

राजकारणात पुरोगामी प्रतिमा ठरवण्याची स्पर्धा वाढलेली असताना, वर्धेचे आमदार डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत शपथ घेतल्यानंतर 'जय श्रीराम जय शिवराय'चा नारा देऊन एक वेगळाच संदेश दिला आहे. ७ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी विधानसभेत शपथ घेतली, त्यानंतर त्यांनी हे उद्घोष केले, ज्यामुळे त्यांच्या हिंदुत्ववादी भूमिकेला प्रगल्भता प्राप्त झाली आहे.

वर्धा जिल्ह्यात महायुतीत भाजपाने चारही विधानसभा मतदारसंघांमध्ये विजय मिळवला असून, या विजयाच्या पार्श्वभूमीवर डॉ. पंकज भोयर यांनी आपल्या प्रचारात 'जय श्रीराम'चा नारा दिला होता. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारातही त्यांच्या भाषणाची सुरूवात 'जय श्रीराम'च्या उद्घोषाने झाली होती.



विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात वर्धेतील राम मंदिरात दर्शन घेऊन त्यांनी प्रचार केला आणि निकाल लागल्यानंतर विजयी मिरवणूक राम मंदिरात नेली होती. आजच्या शपथविधीच्या वेळी, डॉ. पंकज भोयर यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांचे पालन करण्याची शपथ घेतल्यानंतर 'जय श्रीराम जय शिवराय'च्या उद्घोषाने आपली भूमिका स्पष्ट केली, ज्यामुळे राम आणि शिवराय भक्तांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारा विरोधात वर्धेत 'जनआक्रोश मोर्चा'

**वर्धा । प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू आणि बौद्ध बांधवांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात सकल हिंदू समाजाच्या वर्धा जिल्हा शाखेच्या नेतृत्वाखाली १० तारखेला एक भव्य 'जनआक्रोश मोर्चा' आयोजित करण्यात आला. या मोर्चाचा उद्देश बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या धार्मिक हिंसा, मालमत्तेच्या नाश, आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा निषेध नोंदविणे हा होता.सकल हिंदू समाजाने भारत सरकारकडे मागणी केली आहे की बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, आणि इतर धर्मीयांवरील अत्याचारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर वाचा फोडावी. तसेच, या समुदायांना संरक्षण मिळावे यासाठी ठोस पावले उचलावीत.

वर्धा जिल्ह्यातील सर्व समाज घटकांनी मोठ्या प्रमाणावर या मोर्चाला पाठिंबा दिला. शहरातील मुख्य मार्गांवरून हा मोर्चा निघून सकाळ मैदानावर एका सभेत समाप्त झाला.सभेमध्ये प्रमुख वक्त्यांनी बांगलादेशातील परिस्थितीबाबत जागरूकता निर्माण केली आणि धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली सुरू असलेल्या अत्याचारांवर आक्रमक भूमिका घेतली. यावेळी प्रमुख वक्त्यांमध्ये श्री. सुनील पटेल, श्रीमती अर्जुनबाई बांगडडे आणि श्री. निलेश मुंगे यांचा समावेश होता. त्यांनी भारत सरकारला विनंती केली की, आंतरराष्ट्रीय समुदायाशी चर्चा करून बांगलादेशातील हिंदूंना न्याय मिळवून द्यावा.


बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा निषेध करावा आणि त्याविरुद्ध आंतरराष्ट्रीय स्तरावर कठोर भूमिका घ्यावी. अत्याचारग्रस्त हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चन समुदायांना संरक्षण मिळावे. मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या घटनांवर आंतरराष्ट्रीय न्यायालयात तक्रार नोंदवावी. भारत सरकारने बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांसाठी कायमस्वरूपी संरक्षण योजना आणावी.या कार्यक्रमाला वर्धा जिल्ह्यातील विविध संस्थांचे व समाज घटकांचे मोठे समर्थन मिळाले. सकल हिंदू समाजाने एकजुटीचे प्रतीक म्हणून या प्रकारच्या आंदोलनांचा पाठपुरावा करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.



# नव्वोदोत्तर झाडीपट्टी रंगभूमी चिंतन आणि चिकित्सा
## संपादित ग्रंथाला महामृत्युंजय वाड:मय पुरस्कार

**ब्रह्मपुरी । प्रतिनिधी**

झाडीपट्टी रंगभूमीवरील विनोदी कलावंत डॉ शेखर डोंगरे यांच्यावरील डॉ.श्याम मोहरकर,डॉ.धनराज खानोरकर,डॉ.जनबंधू मेश्राम, डॉ.राज मुसणे यांनी संपादित केलेल्या गौरवग्रंथाला अतिशय मानाचा संपादनाला नाटयश्री साहित्य कलामंच, गडचिरोलीचा महामृत्युंजय वाड:मय पुरस्कार - २०२४ घोषित करण्यात आलेला आहे. सदर पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते १५ डिसेंबर २०२४ला करण्यात येईल असे संस्थेचे संयोजक नाटककार चुडारामजी बल्हारपुरे यांनी पत्राद्वारे कळविले आहे. संपादनासाठी पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ मोहरकर, डॉ खानोरकर,डॉ मेश्राम, डॉ मुसणेंचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




# पाथर्डी नगरपरिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी नगरपरिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी नगरपरिषद अधिकारी संतोष लांडगे साहेब यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले.



कार्यक्रमात नगरपालिकेचे कर्मचारी मदने सर, अंबादास साठे सर, शंकर मर्दाने सर, संजय खोर्दे सर, डोमकावळे सर, सोनटक्के सर, आणि अमित वैद्य यांनी देखील सहभाग घेतला. या कार्यक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक, आणि राजकीय कार्य स्मरणात ठेवून त्यांच्या विचारांचा आदर करण्यात आला. हा उपक्रम पाथर्डी नगरपरिषदेच्या वतीने त्यांच्या आदर्शांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

# विवेकानंद महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी



**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पुस्तकांचे प्रदर्शन करण्यात आले. या प्रदर्शनीला विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोराचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे, सहसचिव राजू गावंडे, कोषाध्यक्ष अभिजीत बोथले, सदस्य शैलेश महाजन, प्राचार्य डॉ नामदेव उमाटे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट दिली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. सुधीर आस्टुनकर, श्रध्दा वऱ्हाडे यांनी अथक परिश्रम घेतले. या प्रदर्शनीला अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी भेट दिली

# किशोरवयीन मुलांसाठी मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

किशोरवयीन मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बदलांवर लक्ष केंद्रित करत, विद्या विकास हायस्कूल हिंगणघाट येथे सखी सावित्री समिती व इनर्विल क्लब हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. नयना तुळसकर होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रणाली सायंकर आणि इनर्विल क्लबच्या अध्यक्षा डॉ. रुपल कोठारी उपस्थित होत्या.

डॉ. प्रणाली सायंकर यांनी आपल्या भाषणातून किशोरवयीन मुलांच्या लैंगिक शिक्षणाविषयी स्पष्ट मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या वैद्यकीय अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना अवेळी येणाऱ्या संकटांपासून सावध राहण्याचे महत्त्व सांगितले. डॉ. रेखा नानवटकर यांनी एड्स आणि क्षयत मधील महत्त्वाचे फरक समजावून सांगत विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जागरुकतेवर भर दिला.

डॉ. नयना तुळसकर यांनी विद्यार्थ्यांच्या आहार, व्यायाम आणि स्वच्छतेच्या सवयींबद्दल मार्गदर्शन करत आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले.पंचायत समितीच्या संगीता पेठे यांनी विद्यार्थी सुरक्षेसाठी महत्त्वाचे कायदे व आवश्यक फोन नंबर याबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मुख्याध्यापक नितेश रोडे यांच्यासह शिक्षकवर्ग आणि कर्मचारी, यामध्ये गोल्हर, कोळसे, मानकर, तेलंग, सिडामे, टिपले, परबत, पुसदेकर ,नाल्हे, खांदनकर, अमोल तिखट व शिल्पा शिवणकर यांचा मोलाचा वाटा होता.कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसोबत पालकांचा देखील मोठा प्रतिसाद लाभला.




# महायुतीकडून राष्ट्रवादीचे खासदार अमर कळे यांना जोरदार धक्का

**वर्धा । प्रतिनिधी**

कोणत्याही राजकीय पक्षाने सत्ता हस्तगत केल्यानंतर विरोधकांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न हा नवीन नाही. लोकसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर अवघ्या चार महिन्यांत 'नॉट रिचेबल' ठरलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमर कळे यांच्या ताब्यातील संस्थेवर महायुती सरकारने वक्रदृष्टी टाकली आहे. यामुळे कारंजा बाजार उपसमिती, ज्यावर खासदार कळे गटाचे वर्चस्व होते, ती बरखास्त करण्यात आली असून जिल्हा उपनिबंधक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



बाजार समितीच्या स्वायत्ततेचा संघर्ष: आष्टी बाजार समितीच्या उपशाखेप्रमाणे कारंजा बाजार समितीची स्थापना झाली होती. माजी आमदार दादाराव केचे यांनी दोन्ही बाजार समित्या स्वतंत्र ठेवण्याची मागणी बऱ्याच काळापासून केली होती. अखेर या मागणीला यश मिळाले आहे. कारंजा उपबाजार समितीत खासदार कळे गटाचे सभापतीसह १४ संचालक आणि भाजपाचे ३ संचालक होते. आता या संचालक मंडळाला बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आला आहे. लवकरच कारंजा व आष्टी बाजार समित्या स्वतंत्रपणे काम सुरू करतील.

महायुतीकडून दुसरा धक्का: १५ दिवसांपूर्वीच विधानसभा निवडणुकीत अमर कळे यांच्या पत्नी मयुरी कळे यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर आता कारंजा बाजार समितीवरचे कळे गटाचे वर्चस्वही संपुष्टात आले आहे. महायुतीकडून खासदार अमर कळे यांना हा दुसरा मोठा धक्का मानला जात आहे.

सत्ताप्राप्तीनंतरच्या हालचाली: सत्ताधारी पक्षाच्या या निर्णयामुळे राजकीय वातावरणात खळबळ माजली असून कारंजा बाजार समितीवरील प्रशासकीय हस्तक्षेपामुळे पुढील राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुख्याध्यापक महाकाळकर यांचा सपत्नीक सेवानिवृत्ती सत्कार सोहळा उत्साहात पार पडला

**चिमुर । शेषराव राऊत**

पंचायत समिती चिमुर अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कन्हाळगाव, केंद्र जामगाव, बीट भिसी येथील मुख्याध्यापक मनोहर शंकरराव महाकाळकर आणि त्यांच्या पत्नी अल्का महाकाळकर यांच्या सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




कार्यक्रमाचे उद्घाटन शंकरपुर बिटाचे शिक्षण विस्तार अधिकारी स्वप्नील खांडेकर यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी भिसी बिटाचे शिक्षण विस्तार अधिकारी विशाल बोधाणे होते. यावेळी महात्मा फुले विद्यालय महालगाव (कालु) चे मुख्याध्यापक हंसराज गजभीये, केंद्र प्रमुख विजय निनावे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक भोंबले, उपाध्यक्ष राखी घरत, ग्रामपंचायत सरपंच विजेंद्र घरत यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पणाने झाली. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करत मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर मुख्याध्यापक मनोहर महाकाळकर व अल्का महाकाळकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन महालगाव (कालु) चे शिक्षक संजय मेश्राम यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विषय शिक्षक तुळशीराम बेलखोडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका जिजा चलाख, वत्सला घुमडे, स्वयंसेवक स्वप्नील भुसारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकाला निरोप देताना भावनिक होत अश्रू अनावर केले. कार्यक्रमाला शाळेच्या व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीमद् शिव महापुराण कथा पुलगावमध्ये सुरु

# १०१ मंगल कलशांसह भव्य कलश यात्रा उत्साहात पार पडली




**पुलगाव । प्रतिनिधी**

प्रसिद्ध समाजसेवक लखनलाल केशरवाणी यांच्या गांधी नगर निवासस्थानाच्या प्रांगणात आजपासून (८ डिसेंबर) भव्य श्रीमद् शिव महापुराण कथा प्रारंभ झाली आहे. हा धार्मिक सोहळा ८ डिसेंबर ते १५ डिसेंबरदरम्यान होणार असून, धामापूरवासी परमपूज्य महंत श्री राधेश्यामजी व्यास महाराज यांच्या संगीतमय वाणीतून कथा सादर केली जात आहे.

कथेला प्रारंभ करण्यापूर्वी मंगलमय कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत १०१ महिलांनी मंगल कलश डोक्यावर वाहून सहभाग घेतला. यावेळी लखनलाल केशरवाणी व सौ. मधुलता केशरवाणी शिवपुराण ग्रंथ डोक्यावर घेऊन सहभागी झाले. महंत राधेश्यामजी व्यास महाराज रथावर विराजमान होते, तर केशरवाणी परिवारातील सदस्य आणि शहरातील भाविक मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते.

शिवपूजनाची झांकी हे या यात्रेचे मुख्य आकर्षण होते. मिरवणुकीदरम्यान मार्गावर ठिकठिकाणी शोभायात्रेचे पूजन आणि स्वागत करण्यात आले. कथा स्थळी गणेश पूजन, गौरी पूजन, नवग्रह पूजन, तसेच ग्रंथ आणि व्यास पूजनाने धार्मिक सोहळ्याची सुरुवात झाली.कथावाचनाला शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली असून, या कार्यक्रमामुळे पुलगावमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. लखनलाल केशरवाणी आणि संपूर्ण केशरवाणी परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, ज्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# साहेब तुम्ही बोलणार नसाल तर आम्ही बोंबलणार...

## 'लवकरच बोंबाबोंब आंदोलन करणार' शिक्षक भारतीचा निर्धार

**सोलापूर । प्रतिनिधी**

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी बोगस, बेकायदेशीर शिक्षक मान्यता या विषयावर बोलणार नाही, असा पवित्रा घेतला आहे.सोलापूर जिल्ह्यातील एकूण ९ बोगस व बेकायदेशीर मान्यतेच्या पुराव्यानिशी तक्रारी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याकडे करण्यात आलेल्या आहेत. याविषयी २३ ऑगस्ट २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार या मान्यता रद्द करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी शिक्षक भारतीने केलेली आहे. जिल्ह्यातील खाजगी शाळांमध्ये घेतलेल्या बोगस मान्यतांवर कारवाई केव्हा करणार याविषयी वृत्तपत्राकडून विचारणा करण्यात आल्यानंतर माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी या मान्यतेविषयी बोलणार नाही असे उत्तर दिले आहे. त्यांनी ही भूमिका घेतल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

सचिन जगताप यांची भूमिका संशयास्पद असल्याचा दावा शिक्षक भारती कडून यापूर्वीच करण्यात आलेला आहे. बोगस मान्यता घेतलेले शिक्षक, कर्मचारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांना सचिन जगताप यांनी पाठीशी घातल्याने माध्यमिक शिक्षण विभागाच्या पारदर्शक कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर शिक्षण अधिकाऱ्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून वस्तुनिष्ठ अहवाल मागवून घेण्याऐवजी बोगस मान्यता प्रकरणावर काहीही बोलणार नाही ही भूमिका घेतलेली आहे. या प्रकारामुळे शिक्षणाधिकारी बोगस मान्यता घेणाऱ्या

**बोगस मान्यतेवर शिक्षणाधिकारी बोलणार नसतील तर शिक्षक भारती शांत बसणार नाही. शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी सचिन जगताप यांच्या विरोधात लवकरच बोंबाबोंब आंदोलन करण्यात येईल. शिक्षण विभागातील भ्रष्टाचार थांबवण्यासाठी बोगस मान्यतेवर कारवाई झालीच पाहिजे.**
**सुजितकुमार काटमोरे,जिल्हा अध्यक्ष,शिक्षक भारती सोलापूर**

रॅकेटमध्ये सहभागी असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी लवकरच बोंबाबोंब आंदोलन करून या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधणार असल्याचे सांगितले. शिक्षक भारतीने निवेदन देऊन व सनदशीर मार्गाने पाठपुरावा करून शिक्षण अधिकाऱ्यांनी घेतलेल्या चुकीच्या भूमिकेमुळे शिक्षक भारती आक्रमक होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी संघटनेचे देवदत्त मेटकरी, अमोल तावस्कर, नितीन रुपनर, शरद पवार, शाहूराव बाबर, शशिकांत पाटील, रियाजअहमद अत्तार, राजकुमार देवकते, विजयकुमार गुंड, शरीफ चिक्कळी, मायाप्पा हाके, सिद्धाराम तळवार, प्रवीण जाधव, बाळकृष्ण गायकवाड हे पदाधिकारी उपस्थित होते.

# कंधार तालुक्यात कापसावर लाल्या व हळदीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव

**कंधार । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. एकीकडे बेमोसमी पावसामुळे कपाशीवर लाल्या व अन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनात मोठी घट झाली तर दुसरीकडे जो माल हाताशी आला आहे,त्याच्या वेचनीसाठी मजुरांची टंचाई आहे,दुसरीकडे प्रतवारी घसरल्याने बाजारातही अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत,सतत होणाऱ्या वातावरणातील बदलाचा परिणाम हळदीच्या पिकावर मोठ्या प्रमाणात जाणू लागला आहे. मारतळा परिसरात मोठ्या प्रमाणात हळदीची लागवड केली जाते. शेतकरी। हळदीच्या पिकाला वर्षभर जपत असतात , परंतु हेच शेतकरी आता संकटात सापडले आहेत.तसेच हळदीच्या पिकांवर मोठ्या प्रमाणात पानावर करपा रोगाचा प्रादुर्भाव पाहावयास मिळतो आहे. त्यामुळे हळदीच्या उत्पादनात २५ ते ३५ टक्केपर्यंत घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांतून बोलले जात आहे,दरवर्षी साधारणपणे दसऱ्याला शेतात कापूस वेचणीचा मुहूर्त असतो, परंतू यावर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात पावसाने धुमाकुळ घातला.

# अपघातामध्ये मायलेकाचा मृत्यू

**पाथर्डी । प्रतिनिधी**

दुचाकी वरून जाणाऱ्या मायलेकाचा अपघातामध्ये जागीच मृत्यू झाला आहे. सोमनाथ पुंडलिक खेडकर वय २०, ताराबाई पुंडलिक खेडकर वय ६० ( रा.कारोडी ता.पाथर्डी)असे मृत झालेल्या मुला आणि आईचे नाव आहे. पाथर्डी तालुक्यातील कारेगाव येथे शुक्रवारी सायंकाळी ही अपघाताची घटना घडली आहे. बीड पाथर्डी या राज्य महामार्गावर कारेगाव शिवारात मोहटा देवीकडून येणारी टाटा सफारी एम एच १६ बी एच ३१५२ चार चाकी वाहन व दुचाकी यात जोराचे धडक होऊन दुचाकीवरील सोमनाथ खेडकर, ताराबाई खेडकर हे माय लेक भीषण अपघातामध्ये यांचा जागीच मृत्यू झाले. खेडकर मायलेक हे एका धार्मिक कार्यक्रमाला गेले तो कार्यक्रम करून पाथर्डी हून करोडी या आपल्या गावाकडे दुचाकी वरून जात असताना हा दुर्दैवी अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, सफारी गाडीचे पुढचे दोन्हीचा निकामी होऊन गाडी रस्त्याच्या बाजूला खड्ड्यात जाऊन आदळली. या गाडीतील ही प्रवाशी जखमी झाले आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ६९वे पुण्यस्मरण कार्यक्रम

**भंडारा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या पुण्यस्मरणानिमित्त भंडारा येथील नागपूर नाका येथे अनुसूचित जाती मोर्चा (भाजप) चे शहराध्यक्ष मयुर मार्कंड नंदेश्वर यांच्या नेतृत्वाखाली एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ७ वाजता प्रज्ञा बोधी विहार, कपिल नगर, भंडारा येथून समाजबांधवांनी आयोजित केलेल्या मोमबत्ती रॅलीने झाली. या रॅलीत शहरातील विविध समाजघटक आणि धर्मांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. रॅली नागपूर नाका येथे पोहोचल्यावर बुद्ध वंदनेने समारोप झाला.या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुर्चीवर प्रत्यक्ष बसलेले आहेत, असा भास निर्माण करणारी सुंदर आणि सजीव शिल्पकृती होती. या शिल्पामुळे उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. शेकडो नागरिकांनी फुले वाहून, डोळ्यात अश्रू घेऊन बाबासाहेबांना आदरांजली अर्पण केली. आमच्या आयुष्यात असे दृश्य याआधी कधीच पाहिले नाही, असे भावनिक उद्गार अनेकांनी काढले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मयुर मार्कंड नंदेश्वर यांचे मित्रमंडळ आणि अनेक सहकाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान लाभले. या कार्यक्रमाच्या यशामध्ये सर्वश्री शेखर भाऊ सुखदेवे, कृपाल भाऊ मेश्राम, नंदू राजपुरोहित, रजत चंद्रिकापुरे, प्रवीण पवडे, नीलिमा रामटेके, नताशा खंडाळे, आम्रपाली नगरारे आणि विशाखा नंदेश्वर (पशिने) चेतना खंडाळे यांनी खूप परिश्रम घेतले.या अभिनव कार्यक्रमाला विविध समाजबांधव आणि धर्मियांनी भेट दिली आणि बाबासाहेबांना वंदन केले. कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाची आणि शिस्तबद्धतेची सर्वत्र स्तुती झाली. संपूर्ण शहराचे आकर्षण ठरलेल्या या कार्यक्रमामुळे नागपूर नाका एक ऐतिहासिक ठिकाण बनले.हा कार्यक्रम सर्व बाबतीत यशस्वी ठरल्याने उपस्थित सर्वांनी मयुर मार्कंड नंदेश्वर आणि त्यांच्या संपूर्ण कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .